अलमुरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी, सापगाव, ता.शहापूर, जि.ठाणे या संस्थेविरोधातील तक्रारींची चौकशी करण्याकरिता एक सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती नियुक्त करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्र.विपता-२०२६/प्र.क्र.३८/ई-१५५९५५१/तांशि-४**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**दिनांक : १६ एप्रिल, २०२६.**

**प्रस्तावना :-**

अलमुरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी, सापगाव, ता.शहापूर, जि.ठाणे या संस्थेविरोधातील तक्रारींच्या अनुषंगाने विधानमंडळात तारांकित प्रश्न क्र.७०१४ उपस्थित करण्यात आला होता. सदर प्रश्नाच्या अनुषंगाने मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांनी दि.२४.०२.२०२६ रोजी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने, शासनस्तरावर एक सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार समिती नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अलमुरी रत्नमाला इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी, सापगाव, ता.शहापूर, जि.ठाणे या संस्थेविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी खालीलप्रमाणे एक सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती नियुक्त करण्यात येत आहे.

| अध्यक्ष / सदस्य यांचे नाव | पदनाम |
|---|---|
| डॉ.सुनील भिरूड | कुलगुरू, सीओईपी विद्यापीठ, पुणे |

२. **समितीचे अधिकार व कार्यकक्षा** :-

अ) समिती सदर संस्थेविरुध्द शासन, शुल्क नियामक प्राधिकरण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ तसेच, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करेल.

ब) समितीला संस्थेविरोधात आलेल्या तक्रारींची तपासणी करण्याचे व त्यावर सुनावणी घेण्याचे अधिकार असतील.

क) समितीला सर्व संबंधित व्यक्तींना चौकशीसाठी हजर राहण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार असेल.

ड) समिती तक्रारदारांना बोलावून त्यांच्याकडे असलेले पुरावे गोळा करेल आणि त्यांचा सखोल अभ्यास करेल.

इ) सदर समिती चौकशीअंती, शिफारशींसह तिचा अहवाल तीन महिन्यात शासनास सादर करेल.

३. सदर समितीने तीन महिन्यात चौकशी अहवाल शिफारशींसह शासनास सादर करावा. समितीला आवश्यक ते कार्यालयीन सहाय्य तंत्रशिक्षण संचालनालयाकडून पुरविण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४१६१५३६०८३४०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL RAMCHANDRA CHAURE

Digitally signed by ANIL RAMCHANDRA CHAURE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HTED, 2.5.4.20=6702D541C3481612BAD5DC130EEB99A9B97C00C39D6C82D68BCB086B1FA08698, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=442E1293BBCF028938E3D674F26AB93E80F0C579F8D94DD6EF3DB6A124829D69, cn=ANIL RAMCHANDRA CHAURE
Date: 2026.04.16 15:37:33 +05'30'

**( अनिल चौरे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४) डॉ.सुनील भिरुड, कुलगुरु, सीओईपी विद्यापीठ, पुणे
५) कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
६) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
७) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
९) सह सचिव (तंत्र शिक्षण), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती (तांशि-४).